नि.फौ.प्र. क्र. ४३/२०१६

शासन – वि– शिवाजी व इतर

निशाणी क्र. २८

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १</u>**

माझे नाव – सुनिल विठ्ठल गोसावी

वय – ५२ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. – दहिवडी, ता. माण, जि. सातारा.

**<u>सरतपासणी फौ.प्र.संहिता कलम २७७–अ प्रमाणे सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

**<u>श्री. ए.व्ही. रजपुत साहेब यांच्याव्दारे</u>**

मी आरोपींना ओळखतो. त्यांनी मला जमिनीचा दस्त करुन दिला होता. आज आरोपी शिवाजी न्यायालयात हजर आहे. दुसरा आरोपी मारुती मयत आहे. आमची दहिवडी हद्दीत वडिलोपार्जित जमिन आहे. त्याचा रि.स.क्र. ३६७/९ असा क्रमांक आहे. त्याचे क्षेत्रफळ ९७ आर आहे. त्यापैकी ४६ आर आंधळी प्रकल्पग्रस्तासाठी विशेष भुसंपादन अधिकारी यांनी काढून घेतले. त्याचा फेरफार क्र. १६०५९ असा झाला. त्यानंतर १९८५ साली सदरील जमिन फेरफार क्र. १७०४६ प्रमाणे आरोपीच्या नावे नोंदविण्यात आली. आरोपी हे परजिल्हयातील असल्यामुळे त्यांनी त्या जमिनीची कधीही वहिवाट केली नाही. त्यामुळे सदरील जमिन ही माझ्याच कब्जात होती. आरोपींना त्यांची जमिन मी व माझा चुलत भाऊ –अनिल गोसावी असे वहिवाटीत आहे असे समजले. आरोपींनी आम्हांला विनंती केली की, आम्ही परजिल्हयात राहत असून आम्हाला सदर जमिन वहिवाट करणेस येत नाही तरी तुम्ही ती जमिन परत घ्या. आरोपींनी आम्हांला र.रु. ६०,०००/– मोबदला घेवून सदर जमिनीचे दि. ११.१२.१९९७ रोजी ४६आर एवढे क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचे नोंदणीकृत दस्त करुन दिला. सदर जमीनीचा गट क्र. ३६७/९/२ असा होता. त्याचे

क्षेत्रफळ ४६ आर एवढे होते. सदर जमिनीचा ताबा हा पूर्वीपासून आमच्याकडेच आहे व आता देखील आमच्याकडे आहे. दस्त केल्यानंतर ७/१२ असलेली आमची पोकळ नोंद राहून गेली. सदर पोकळ नोंदीचा फायदा घेवून आरोपींनी सदरची जमीन अमोल गुंडगे व विजय गलंडे यांना दि. १८.०७.२०१४ रोजी विक्री केली. जमिन घेणारे व्यक्ती हे दहिवडी गावचे असल्यामुळे व आमचे त्यांच्याशी ओळखीचे संबंध असल्याचे आरोपींना माहिती होते. दस्तासोबत आरोपींनी कब्जा असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. सदरचे प्रतिज्ञापत्र आरोपींनी तहसीलदार कार्यालयात दुसरे खरेदीपत्र करण्याची परवानगी मिळविण्यासाठी केले होते. आरोपींनी आमची फसवणुक केली असल्यामुळे आम्ही न्यायालयात दिवाणी दावा क्र. १७७/२०१४ हा दाखल केला आहे. आरोपींनी त्या दाव्यात खोटी कैफियत दाखल केली व पहिला दस्त करुन दिला नसल्याचे कथन केले होते. आम्हाला आरोपींनी दि. ११.१२.१९९७ रोजी करुन दिलेल्या दस्ताची नोंद व्हावी व दि. १८.०७.२०१४ चा दस्त रद्द करावा म्हणून वकिलांमार्फत आरोपींना नोटीस पाठविली. आरोपींनी नोटीस घेण्यास नकार दिला. मी न्यायालयात फौजदारी तक्रार देखील दाखल केली. पोलीसांनी आमचे जबाब नोंदविले. पोलीसांनी माझा जबाब दि. २३.०३.२०१६ रोजी नोंदविला. आता मला न्यायालयात दाखल करणेत आली तक्रार दाखविण्यात आली असता तीच आहे. त्यावर माझी व वकिलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील तक्रारीला **निशाणी २९** देण्यात येत आहे. आता मला पोलीसांनी माझा दि. २३.०३.२०१६ रोजी नोंदविलेला जबाब दाखविला असता तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाणी ३०** देण्यात येत आहे.

०२. आता मला फेरफार क्र. १६०५९ ची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्याला **निशाणी क्र. ३१** देण्यात येत आहे. आता मला फेरफार क्र. १७०४६ ची छायांकित प्रत दाखविण्यात आली. त्याला **आर्टीकल 'अ'** देण्यात येत आहे.

सदर फेरफार क्र. १७०४६ ची मुळ प्रत दाखल करणेस मी तयार आहे. आता मला दि. ११.१२.१९९७ रोजीचा दस्ताची प्रमाणित प्रत दाखविण्यात आला. सदर दस्ताची मुळ प्रत ही नि.दि.दा.क्र. १७७/२०१४ मध्ये दाखल आहे. सदर दस्ताला **निशाणी ३२** देण्यात येत आहे. त्यानंतर दि. १८.०७.२०१४ रोजी आरोपींनी सदरची जमिन परत अमोल गुंडगे व विजय गलंडे यांना विक्री केली. आता मला दि. १८.०७.२०१४ रोजीच्या दस्ताची प्रमाणित प्रत दाखविण्यात आला. सदर दस्ताला **निशाणी ३३** देण्यात येत आहे. आता मला दि. ०५.०४.२०१४ रोजीचे प्रतिज्ञापत्र आरोपीने केलेले खोटे प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले. ती छायांकित प्रत असल्यामुळे त्याला **आर्टीकल 'ब'** देण्यात येत आहे. आता मला नि.दि.दा.क्र. १७७/२०१४ मधील निशाणी १ दावा व त्यावर आरोपींनी दाखल केलेली कैफियत यांच्या प्रमाणित प्रती दाखविण्यात आल्या. त्यांना अनुक्रमे **निशाणी ३४ व ३५** देण्यात येत आहे. आता मला मी दि. २७.०९.२०१४ रोजी आरोपींना वकिलांमार्फत पाठविलेली नोटीसची छायांकित प्रत दाखविण्यात आली. त्याला **आर्टीकल 'क'** देण्यात येत आहे. आता सदरील जमिनीला सरकारी दप्तराची नोंद आहे. आता मला सदरील जमिनीला सरकारी दत्परीचा नोंद झाल्याचा आदेश दाखविण्यात आला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ३६** देण्यात येत आहे. माझी व माझा चुलत भाऊ अनिल गोसावी यांची आरोपींनी फसणुक केली म्हणून मी तक्रार दाखल केली होती.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. के.डी. भोसले वकिल साहेब यांचे मार्फत सुरू</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, सदरील जमिन ही आमच्या वडिलोपार्जित मालकीची आहे याबाबत मी या प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. दोन्ही फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे तयार झाले, हे मला सांगता येणार नाही. तथाकथित खरेदीपत्राची नोंद करण्याचा प्रयत्न आम्ही स्वत: केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या तथाकथित दि. ११.१२.१९९७ च्या खरेदीपत्राची नोंद

ही सदरचे खरेदीपत्र हे मुळात बेकायदेशीर असल्याने फेरफार क्र. १८५५४ ने दि.३०.०१.१९९८ रोजी नामंजूर झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आम्हाला कधीही म्हणाले नाहीत की तुमच्या खरेदीपत्राची नोंद आम्ही करुन देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१४ पर्यत आरोपींकडे मी खरेदीपत्राची नोंद करुन देत नाहीत म्हणून कोणतीही नोटीस किंवा तक्रार केली नाही. मला याबद्दल माहिती नाही, सदरील जमिन भोगवटादार वर्ग २ असल्याबाबतची नोंद ७/१२ सदरी आहे. याबद्दल मला माहिती नाही की, सदरील जमिन भोगवटादार वर्ग २ ची असल्यामुळे सरकारची परवानी असल्याशिवाय विकत घेता येत नाही. याबद्दल मला माहिती नाही की, सदरील जमिनीच्या इतर हक्कामध्ये नविन शर्तीचा असा शेरा आहे. मला याबद्दल माहिती नाही की, मी सदर जमिन खरेदी करतांना सरकारची परवानगी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, सरकारची परवानगी घेतली नसल्यामुळे माझ्या दस्ताची नोंद रद्द झाली. याबद्दल मला माहिती नाही की, फेरफार क्र. १८५५४ हा आजपर्यत मी कोठेही आव्हानित केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, १९९७ च्या खरेदीपत्रान्वये मला सदर जमिनीची मालकी कोणत्याही न्यायालयामार्फत मिळालेली नाही. याबद्दल मला सांगता येणार नाही की, नि.दि.दा.क्र. १७७/२०१४ मध्ये मी मालक आहे असे जाहीर ठराव होऊन मिळावा व मी ४६आर एवढया जमिनीमध्ये विरुध्द हक्काने मालक झालो आहे अशी मागणी केली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी सन १९९७ च्या खरेदीपत्राद्वारे माझ्या नावाची नोंद व्हावे व सन २०१४ चे खरेदीपत्र रद्द व्हावे अशी त्या दाव्यामध्ये मागणी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील जमिन ही माझ्या ताब्यात असल्याबाबतचे कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. मी सदर कागदपत्रे म्हणजे खरेदीपत्र या प्रकरणात दाखल केली आहेत. याबद्दल मी सांगू शकत नाही की, ७/१२ उता–यावर मालक कोण व वहिवाटदार कोण अशा नोंदी असतात. हे म्हणणे खरे नाही की, ४६आर एवढया जमिनीला माझी मालक किंवा वहिवाटदार म्हणून नोंद नाही.

मी ४६आर एवढया जमिनीला माझी मालक किंवा वहिवाटदार म्हणून नोंद आहे याबाबतचा ७/१२ उतारा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावाची तशी नोंद नाही म्हणून मी ७/१२ उतारा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या चुलत भावाने पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे तक्रारी अर्ज केला होता, म्हणून सदर जमिनीवर सरकारची नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ सदरी सरकारची नोंद झाली म्हणून मी त्याबाबत कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९७ च्या खरेदीपत्राने कोणताही हक्क येत नाही, म्हणून पुनर्वसन खात्याकडे तक्रार मी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सरकारची नोंद कोणत्या कागदपत्राच्या आधारे झाली याबद्दल मला माहिती नाही.

**मध्यांतराची वेळ झाल्यामुळे उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

(एस.एस. गाडवे)

दि.१५/०२/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.